Vol 2 Issue 7 Jan 2013 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 7, Jan. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# *महाराष्ट्रातील शिवपूर्वकालीन सावकारी*

***प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी***

वसुंधरा कला महविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर.

***सारांश***

महाराष्ट्राचा उल्लेख इ.स.पूर्व पहिल्या शतकापासून आढळून येतो. महाराष्ट्रात सातवाहन राजवटी पासून स्वतंत्र राजसत्तेचे पर्व सुरू होते. धर्मशास्त्रात राज्याची जी सात अंगे सांगितली आहेत त्यानुसार सातवाहन राजवट होती. उद्योगाच्या विविध श्रेणी होत्या. श्रेणीच्या प्रमुखास श्रेष्ठी म्हणत. महाराष्ट्रात त्याकाळी अनेक व्यापारी पेठा होत्या. सातवाहनांचे रोमशी व्यापारी संबंध होते.

***प्रस्तावना :–***

सातवाहनानंतर अनेक राजवटी होऊन गेल्या. त्यात यादवाची राजवट महत्वाची मानली जाते. या काळात राज्यात अनेक व्यापारी संघटना होत्या. यानंतर मोगल कालखंड येतो.

### *1) सातवाहनकालीन सावकारीचे स्वरूप :*

पुरातनकाळापासून भारतात त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सावकार हा राष्ट्राचा एक उपयुक्त घटक म्हणूनच गणला गेला आहे. परंतु त्याचे स्वरूप आजच्या सावकारशाहीसारखे नव्हते तर त्याच्या स्वरूपाची कल्पना आपणास सातवाहनकालीन शिलालेखातून व तत्कालीन व्यापार व अर्थव्यवस्थेपासून येते.

प्राचीनकाळात व्यापारी श्रेणी होत्या. या कालखंडातील प्रत्येक क्षेत्रात काम करणारी मंडळी संघटित होऊन आपल्या व्यवसायातील सर्व प्रकारच्या गरजा भागवत होती. समस्या सोडवत होती. अशा समव्यावसायिक संघटनांना 'श्रेणी' अशी संज्ञा होती.

अशा व्यापारश्रेणीमध्ये धर्म व जात हा मुद्दा गौण असे. सर्व शहरांमध्ये विणकर, तेली, कुंभार, माळी, लोहार, चांभार, सुवर्णकार, बुरूड यांच्या व्यापारश्रेणी (संघ) असत. श्रेणी संघाच्या कार्याचा व्याप व त्यांचा सभासदांची संख्या यांचा एकमेकांशी संबंध असत.[1]

सातवाहनकाळात अशा प्रकारच्या 18 श्रेण्या अस्तित्वात असल्याची शिलालेखात व समकालीन साहित्यात आढळून येते.

यामध्ये सुतार, धातुकाम करणारे, पाथरवट, चर्मकार, हस्तीदंत काम करणारे, पाणी उपसा पुरवठा करणारे, औद्योगिक (Fabricators of hydraulic Engine) वसकर (बुरूड), कासार, जवाहिरे, विणकर, कुंभकार, रंगारी, तेलपिसक, चित्रकार, अडती, कोळी, सुगंधी, माळी आदींचा समावेश होता. याशिवाय खाणकामगार, गुराखी, सागरावर जीवन जगणारे यांच्याही श्रेण्या होत्या.[2]

या सर्व श्रेण्यांचे व्यवहार श्रेणीप्रमुख पाहत असल्याने त्यांचे वास्तव्य मोठया व्यापारी केंद्रात किंवा राजधानीच्या ठिकाणी असे. या श्रेणी प्रमुखास श्रेष्ठी म्हटले जात. या श्रेष्ठींना राजदरबारात मोठा मान असे. काही श्रेष्ठींना राज्याचा अधिकोश सांभाळण्याची कामगिरी करावी लागे. तसेच काहींवर नाणी पाडण्याची जबाबदारी सोपविली जाई. प्रशासन, न्यायदान, शिक्षण यासारख्या शासनाच्या विविध भागात त्यांना अधिकारपदे देण्याची प्रथा होती.[3]

यावरून सातवाहनकाळातील व्यापारी श्रेणी व त्यांचे प्रमुख श्रेष्ठी यांचा व्यवहार हा आजच्या बँकिंग व्यवहारासारखा असावा. कारण कारागिरांना त्यांच्या व्यवसायासाठी पतपुरवठा करून व त्यांचा उत्पादित माल विक्री करून या संघटना एक प्रकारे सावकारी व्यवसायच करत असाव्यात. कारण पतपुरवठयाच्या बदल्यात ते काही टक्के व्याज आकारीत होते. यातील काही संघटनाकडे नाणे पाडण्याचे काम असल्यामुळे त्यातूनही त्यांना नफा मिळत होता. सातवाहनकालीन अर्थव्यवस्थेचा या व्यापारी श्रेणींना एकप्रकारे आधारच होता. सातवाहनकालीन अर्थव्यवस्थेची संपूर्ण धुरा ही या श्रेष्ठींच्या हातात असत.

या श्रेष्ठींचाच पुढे शेठ, सावकार झाला. श्रेष्ठींचे रूपांतर शेट्टीत झाले. त्याचे एक उदाहरण म्हणजे बीड येथील स्वामी रामानंद साळी यांनी म्हटले आहे की, विणकर श्रेणीचे प्रमुख ईश्वर शेट्टी होते.[4] पुढे शेट्टीचे शेठ झाले व आजही व्यापाऱ्यांना व सावकारांना शेठ म्हणण्याची प्रथा आहे. आजही शेट्टी, शेटये, श्रेष्ठ अशी आडनावे आहेत. पुढे व्यापाऱ्यांना शेठ म्हणण्याची प्रथा पडली.

या प्रथेचे मूळ सातवाहनकालीन श्रेणी > श्रेष्ठी मिळते.

## *2) यादवकालीन सावकारीचे स्वरूप :*

सातवाहनकाळातील या श्रेणींचे विकसित रूप यादवकाळातही पहावयास मिळते. व्यापार, श्रेणी, सावकार हे राज्याचे महत्त्वाचे घटक असत. राज्याचा आर्थिक व्यवहार हा घटकांच्याच हातात असे.

या श्रेणींना आपल्या संपत्तीचा उपयोग उद्योगाच्या अभिवृध्दीसाठी करता येत होता. तसेच देवधर्म व दानधर्मासाठी करता येत असे. अनेक व्यापारश्रेणींनी यादव व विजयनगरच्या साम्राजाच्या काळात देवस्थानांना जमिनीचे उत्पन्न दान म्हणून लावून दिले होते. व्यापार श्रेणींकडे जे लष्कर असे त्याची मदत राजा युध्दप्रसंगी घेत असे. तसेच राजाला युध्दमोहिमेसाठी पैसा हवा असेल तर तो व्यापारश्रेणीच्या प्रमुखाकडून घेत असे. युध्दमोहिमेतील लष्कराच्या सर्व गरजाही पुरविण्याचे काम व्यापारी श्रेणीतील व्यापारी करीत असत. ही रक्कम कर्जाऊ स्वरूपात घ्यावी लागे.[5] याचाच अर्थ या व्यापारश्रेणी सावकारी करीत असे. व्याजाने कर्ज देणे हे सावकाराचेच काम होय. तेच काम या व्यापारी श्रेणी करीत असाव्यात. आजच्या भाषेत यास पतसंस्था, बँकिंग व्यवहार करणाऱ्या, वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांचे प्राथमिक रूप म्हणून या धर्मशास्त्रातील माहितीप्रमाणे उच्चदर्जाची पुग नामक दुसरी एक व्यापारी संघटना असे. न्यायदानाबाबत श्रेणीहून पुगचा अधिकार मोठा होता. पुगचे सभासद निरनिराळया व्यापारात प्रतिष्ठा पावलेले, वेगवेगळया जातीचे असले तरी ते सर्व एकाच शहरातील रहिवासी होते. श्रेणी व पुग या दोन्ही संस्थांना राजमान्यता होती. आपापल्या क्षेत्रापुरते न्यायदान करण्याचा अधिकार त्यांना होता. श्रेणीचा निर्णय चुकीचा, अयोग्य वाटला तर पुगच्या समितीकडे आपले म्हणणे मांडता येत असे.[6]

श्रेणींना जशी एका बाजूस राजमान्यता होती त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूस जनतेचा विश्वासही होता. या विश्वासाला तडा न जाऊ देण्याची दखल श्रेणींना घ्यावी लागे. सरकारचा सावकार व समाजाचा उदार दाता. धनाढय श्रेणींची नावे व गावे लक्षात घेतली तर यादवांच्या काळात ते सर्व व्यापारी कर्नाटकी होते हे लक्षात येते. कर्नाटकात श्रेणींचे अस्तित्व जसे मोठया प्रमाणावर होते तसे ते महाराष्ट्रात (उत्तर) दिसत नाही. महाराष्ट्रातील घाऊक व्यापार राष्ट्रकुट–चालुक्यांच्या वेळेसारखाच यादवकाळातही कानडी लोकांच्या हाती होता.[7]

11 ते 13 शतकापर्यंत दक्षिण भारतात भरभराटीस आलेल्या 13 श्रेणीपैकी 3–4 महाराष्ट्रातील होत्या. यादवांच्या मराठी लेखांमध्ये श्रेणी आढळली नाही तरी तेथे लहान–मोठे व्यापारी आपल्या मालाची खरेदी–विक्री एकजुटीने करत. शहरातील व्यापाऱ्यांना एकमेकांशी व्यवहार करणे सोपे जावे म्हणून सावकारांच्या हुंडया वटविणाऱ्या पेढया शहरातून (पैठण, नांदेड, नाशिक, नंदूरबार) होत्या. ग्रामीण श्रेणीच्या प्रमुखास भोजक म्हणत तर नागरी श्रेणीच्या प्रमुखास श्रेष्ठी म्हणत. या सर्व श्रेणींचे परस्पर सहकार्य असे.[8]

यावरून यादवकालीन सावकारीचे स्वरूप हे सातवाहनकालीन सावकारीच्या स्वरूपासारखेच होते असे दिसून येते.

यादवकाळात दक्षिणभारतात ज्या महत्त्वाच्या व्यापार श्रेणी होत्या त्यात प्रामुख्याने

1)मनी ग्रामण (9 वे 13 शतक)
2)नानादेश तिशैयायिर त्रऐनुस्वर (11 ते 12 शतक)
3)देश–सलातू गंडा
4)वीर

इत्यादी नावांनी या व्यापारश्रेणी ओळखल्या जात होत्या.[9]

## *3) मोगलकालीन सावकारीचे स्वरूप :*

'कर्जाऊ रकमा देणारे' व 'पेढीवाले' यांना 'साहू' व 'महाजन' असे मोगलकाळात म्हणत असत. व्यापाऱ्यांना

त्यांच्या व्यवहारासाठी व शेतकऱ्यांना शेतीविषयक गरजांसाठी कर्ज देण्याव्यतिरिक्त हे पेढीवाले अमीर इत्यादींना कर्जाचा पुरवठा करीत.[10] अशा अमीर, उमराव, सरदार, जहागीरदार इत्यादी लोकांचे जीवन धकाधकीचे असे. त्यांच्यापैकी काहींना विलासी जीवन जगण्याची सवय असल्यामुळे तेव्हा त्यांना पैशाची गरज लागत असे. अशावेळी ते सावकाराकडून रकमा कर्जाऊ घेत.

मुघल अमलाखाली असलेल्या भारतातील प्रदेशातील बहुतेक सर्व खेडयामध्ये सराफ अथवा श्रॉफ या नावाने पेढी व्यवहार करणारे लोक असत. ते पैसे देत असत व नाण्यांच्या विनिमयाबद्दलचे रोखे देत असत. ते पैसा या नाण्याच्या संबंधात 'रूपयांची' किंमत वाढवत असत असे तेव्हरनियर याने तक्रारीच्या स्वरूपात म्हटलेले आढळते. ते जेंव्हा जेंव्हा जुनी नाणी बदलून नवी नाणी देत तेंव्हा तेंव्हा ते सुमारे 1/4 किंवा 1/8 प्रतिशत या दराने रकमेची आकारणी करीत असत.[11]

पैसे कर्जाऊ देणारे हे लोक या व्यवहाराशी संबंधित असे इतर अनेक उद्योगधंदे करत असत.

मोगलकाळात हुंडीचे दर विविध भागात वेगवेगळे असत. लाहोर येथून सुरत येथे हुंडी पाठवायचा दर 6.25 टक्के होता. अहमदाबादहून हुंडी पाठवायची असल्यास दर 1.5 टक्का होता. बऱ्हापूरसाठी 2.5 टक्के, बनारससाठी 6 टक्के, पाटणासाठी 7 ते 8 टक्के तर डाक्का यासाठी 10 टक्के दर असे.[12]

अशा प्रकारे विविध भागातून विविध ठिकाणी हुंडी पाठविण्याचे दर वेगवेगळे असे, कधी कधी तर हे दर 22 ते 24 टक्क्यापर्यंत जात असत.

मोगलकाळात चार प्रकारच्या हुंडया देण्याची पध्दत होती. ते प्रकार म्हणजे 'दर्शनी हुंडी', 'मिती हुंडी', 'शहाजोत हुंडी' आणि 'जोखमी हुंडी'.

दर्शनी हुंडीची रक्कम ताबडतोब अदा करावी लागत असे. आजच्या डिमांड ड्राफ्टप्रमाणे तिचे स्वरूप होते. मिती हुंडीची रक्कम हुंडीमध्ये लिहिलेल्या तारखेपासून काही ठराविक दिवसानंतर द्यावी लागत असे. शहाजोत हुंडीची रक्कम कोणाला द्यावयाची याबाबत त्या हुंडीत लिहिलेली नसे. हया हुंडीची रक्कम हुंडीच्या धारक व्यक्तीला द्यावी असा संकेत होता. ती व्यक्ती अर्थातच पतदार व सन्माननीय असावी लागत असे. या हुंडीमध्ये एवढी एकच अट घातलेली असे. अशा प्रकारच्या हुंडीचे स्वतःचे असे गुणदोष होते. जोखीम हुंडी ही अगदी क्वचित प्रसंगी व अगदी जवळच्या अंतरावरील गावाकरीताच दिली जाई. ही हुंडी व्यापारी लोकांना फार सोईची होती.[13] परंतु यातही फार मोठे धोके असत. नफा, नुकसान हे दोन्ही प्रकार या हुंडी पध्दतीत व्यापाऱ्यांना सोसावे लागत असत.

फादर मॉन्सेरेट याने म्हटले आहे की, 'अकबर बादशहाने पेढयांच्या व्यवहारावर बरीच नियंत्रणे लादली होती व त्यांना द्यावयाच्या परवान्यासाठी तो मोठीच रक्कम मिळवीत असे. परवाना घेऊनच पेढीवाल्यांना काही शर्तीवर आपल्या पेढीचे व्यवहार करता येत असे.[14]

जहांगीरच्या कारकिर्दीमध्ये पेढयांचे व्यवहार अधिकच वाढत गेले. पेढयांवर आता सरकारचे सक्त नियंत्रण ठेवलेले नव्हते.

जहांगीर बादशहाच्या वेळचे प्रसिध्द पेढीवाले म्हणजे सुरू येथील वीरजी व्होरा, कोरो मांडेलच्या किनाऱ्यावरील मल्लखा व मलबारमधील शेट्टी हे होत.[15] हे श्रीमंत व्यापारी होते.

मुगलकाळातील काही पेढीवाले इतके श्रीमंत होते की, ते प्रसंगी सरकारलाही कर्ज देत असत. फत्तेमंद मुर्शिदाबाद येथील पेढी चालवत असे. अत्यंत निकडीच्या वेळी त्यांने 'फर्रूखसियार' बादशहाला कर्जापोटी मोठया रकमा आगाऊ पुरविल्या होत्या. या त्याच्या सेवेमुळे खुश होऊन बादशहाने त्याला 'जगत सेठ' अशी समर्पक पदवी बहाल केली होती.[16]

अशा प्रकारे मोगलकाळात सावकारी पध्दतीचे स्वरूप या पेढीच्या रूपाने पहावयास मिळते. मराठा व पेशवेकाळातही हे पेढीवाले सावकारी करताना ऐतिहासिक कागदपत्रातून पहावयास मिळते.


1)डॉ. गाठाळ, एस.एस. — 'भारताचा इतिहास व संस्कृति' कैलास पब्लिकेशन्स्, औरंगाबाद, प्र. आ. 2007, पृ. क्र. 312

2)तत्रैव — पृ. क्र. 313

3)मिराशी, वा.वि. — सातवाहन आणि नाणेघाट लेख क्र. 3

4)स्वामी रामानंद साळी — बीड येथील मुरलीधर मठातील हस्तलिखित बाड

5)डॉ. गाठाळ, एस.एस. — 'भारताचा इतिहास व संस्कृति' पृ. क्र. 311

6)तत्रैव — उपरोक्त क्र. 312

7)तत्रैव — पृ. क्र. 313

8)तत्रैव — उपरोक्त 313, 314

| | |
|---|---|
| 9)तत्रैव | उपरोक्त 314 |
| 10)चिटणीस, कृ.ना. | 'चलन व पेढीव्यवहार' मध्ययुगीन भारतीय सं. व सं. 4, पुणे 1885, पृ. कृ. 58 |
| 11)Tavernier, J. B. | Travels in India by tr. from the original French Edition of 1676, by V. ball (2 vols) London 1889, pp. 24, 25 |
| 12)तत्रैव | 'चलन व पेढी व्यवहार' पृ. क्र. 30 |
| 13)चिटणीस, कृ.ना. | 'चलन व पेढीव्यवहार' मध्ययुगीन भारतीय सं. व सं. 4, पुणे, पृ. कृ. 60 |
| 14)तत्रैव | पृ. क्र. 60 |
| 15)तत्रैव | पृ. क्र. 61 |

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org